# देगलूर महाविद्यालयात बालिका दिन उत्साहात

देगलूर, ता.२५ : आजादी का अमृत महोत्सवानिमित्त देगलूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने 'राष्ट्रीय बालिका दिनाचे' औचित्य साधून डॉ. रत्नाकर लक्षटे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार यांनी विद्यार्थ्यांना बालिका दिनाच्या शुभेच्छा दिल्या. डॉ. लक्षटे यांनी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास आयक्यूएसी समन्वयक डॉ. सुदाम हे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. काशीदे, प्रा.काळे, डॉ. खंदकुरे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. व्यंकट खंदकुरे तर कार्यक्रमाचे आभार प्रा. विनोद काळे यांनी मानले.